2018-19

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi / Hindi Part - I

IMPACT FACTOR /
INDEXING 2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | आद्य क्रांतीवीर वासुदेव फडके यांचे सामाजिक कार्य<br>**डॉ. श्री. निळकंठ रामचंद्र व्यापारी** | १-३ |
| २ | भाववाढ आणि पतनियंत्रण धोरण<br>**डॉ. ढास दत्तात्रय का.** | ४-९ |
| ३ | क्रीडा क्षेत्र आणि महिला<br>**प्रा. जानकी वामनराव कुर्तडीकर** | १०-१३ |
| ४ | बदलती ग्रामीण साहित्य मुल्ये आणि साहित्य<br>**प्रा. अनिरूध्द सर्जेराव उढाण** | १४-१७ |
| ५ | दलित कथेतील परिवर्तनीय स्वरूप-एक आकलन<br>**प्रा. कांबळे डी. आर.** | १८-२० |
| ६ | सेवा हमी कायदा<br>**प्रा. धर्मराज केशवराव कटके** | २१-२३ |
| ७ | माध्यमांतर आणि मराठी साहित्य<br>**डॉ. सुखदेव इघारे** | २४-३० |
| ८ | ग्रामीण आणि शहरी किशोरवयीन विद्यार्थ्यांची संपादन प्रेरणा तुलनात्मक अभ्यास<br>**श्री. खिलारे संदीप सिताराम** | ३१-३४ |
| ९ | भारतातील शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन<br>**प्रा. डॉ. आर. के. शिंदे**<br>**श्री. संतोष गंगाराम रौंदळे** | ३५-३८ |
| १० | २१ व्या शतकात भारतीय परराष्ट्र धोरणापुढील आव्हाने<br>**विवेक बी. आवारे** | ३९-४४ |
| ११ | संस्कृत साहित्यातील हंस<br>**श्रीमती गार्गी पी. व्यवहारे** | ४५-४८ |
| १२ | भारतीय शेतीच्या इतिहासात ज्योतीबांची भूमिका<br>**प्रा. डॉ. आर. पी झनके** | ४९-५१ |

# ६. सेवा हमी कायदा

**प्रा. धर्मराज केशवराव कटके**
सहाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख, लोकप्रशासन विभाग, कला व विज्ञान महाविद्यालय, गढी.

देशात लोकशाही जशी परिपक्व व दृढ होत जाते. त्याबरोबरच नागरिकांकडून हक्काची अधिकाधिक प्रमाणात मागणी होत असते. त्याबरोबरच नागरिकांकडून सहा मुलभूत हक्क दिलेले आहेत. त्याबरोबरच मार्गदर्शक तत्वे ही देखील राज्यघटनेत समाविष्ठ करण्यात आलेली आहेत. अलिकडच्या काळात शिक्षणाचा अधिकार, माहितीचा अधिकार तसेच कामाचा हमी इत्यादी स्वरूपाचे अधिकार मिळालेले आहेत. शासन नागरिकांना विविध प्रकारच्या सेवा पुरवत असते. शासनाकडून दिल्या जाणाऱ्या सेवा अधिकाधिक पारदर्शकपणे, कार्यक्षमपणे निश्चित कालमर्यादेत मिळणे आवश्यक असते. शासनाकडून जनतेला दिल्या जात असलेल्या सर्व सेवा सुयोग्यरितीने मिळाव्यात, त्यासाठी सेवेशी संबंधित अधिकारी, कर्मचारी व विभागाने जबाबदारीने निभवावीत. यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंमलात आणून जनतेस सेवेची हमी दिलेली आहे.

युनाचे माजी सचिव कोफी अन्नांन यांनी 'सुशासनामुळे लोकशाही बळकट होते' असे म्हटले. सुशासनामध्ये शासनाकडून दिल्या जाणाऱ्या सेवा कार्यक्षमपणे पुरविणे अपेक्षित असते. त्यासाठी सेवा हमी कायद्याचे अत्यंत महत्त्व आहे.

भारत सर्वप्रथम मध्यप्रदेशचे तत्कालिन मुख्यमंत्री श्री शिवराज सिंह चव्हाण यांनी १८ ऑगस्ट २०१० मध्ये आपल्या राज्यात कायदा लागू केला. मध्यप्रदेशामधील सेवाहमी कायद्याचे आदर्शप्रारूप समोर ठेवून केंद्रशासनाने सन २०११ मध्ये का कायदा स्वीकारला. तसेच उत्तर प्रदेश, जम्मूकाश्मिर, बिहार, दिल्ली, राजस्थान, झारखंड, छत्तीसगड, पंजाब, मिझोराम, हिमायलप्रदेश, केरळ, आसाम, कर्नाटक, गोवा, गुजरात हरियाणा या राज्यांनी देखील हा कायदा लागू केला. सेवा हमी कायदा आणणारे महाराष्ट्र हे २१ वे राज्य ठरले.

महाराष्ट्र लोकसेवा हमी कायदा २०१५ पूर्वी, भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा १९८८, शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध २००५ हे कायदे अस्तित्वात होते. या कायद्यान्वे जनतेस सेवा विशिष्ठ कालावधीत प्राप्त होण्यात म्हणावे तेवढे यश प्राप्त झाले नाही. त्यासाठी कलम २१३ नुसार महाराष्ट्राचे मा. राज्यपाल यांची १९ ऑगस्ट २०१५ रोजी स्वाक्षरी होऊन २१ ऑगस्ट २०१५ रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क नियम २०१३ हे १८ नोव्हेंबर २०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आले. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ हे सेवाविषयक अधिकारासंबंधीचे एक क्रांतीकारी पाऊल मानले जाते. महाराष्ट्रत या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी 'आपले सरकार' हे पोर्टल सुरू करण्यात 'आपले सरकारचे' २० हजार पेक्षा अधिक कॉमन सर्व्हिस सेंटर सुरू करण्यात आलेले आहे. तसेच RTS महाराष्ट्र हे ॲप देखील सुरू करण्यात आलेले आहे.

### महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५

महाराष्ट्र शासनाकडून 'सेवा आपली, हमी आमची' हे ब्रिद घेऊन या कायद्याची अंमलबजावणी केली जाते. या कायद्यात एकूण ३० कलमांची तरतूद करण्यात आलेली आहे. या कायद्यासाठी नोकरशाही वर्गाचा मुलतः विरोध होता. संबंधित

अधिनियमामुळे नोकरशाही वर्गाचे जबाबदारित्व निश्चित केलेले आहे. या कायद्याच्या योग्य अंमलबजावणीसाठी नागरिकांनी जागृत असणे गरजेचे आहे. नागरिकांच्या जागरूकतेवरच या कायद्याचे यश अवलंबून आहे. कायद्यामुळे प्रशासनात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि जबाबदारीचे तत्व वाढीस लागेल.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ मध्ये हा कायद्या लागू असणाऱ्या सार्वजनिक प्राधिकरणाचा उल्लेख केलेला आहे. कायद्यामध्ये मुख्य आयुक्त किंवा आयुक्त, आयोग, सक्षम अधिकारी, पदनिर्देशित अधिकारी, पात्र व्यक्ती, प्रथम अपिलीय अधिकारी, राज्यशासन, स्थानिक प्राधिकरण, सार्वजनिक लोकसेवा, सेवा हक्क, द्वितीय अपिलीय अधिकारी, नियतकालमर्यादा, यांचा अर्थ स्पष्ट केलेला आहे. कायद्यान्वे प्रत्येक पात्र व्यक्तीस कायदेशीर, तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यतेच्या अधिन राहून लोकसेवा निश्चित कालमर्यादेत प्राप्त करण्याचा हक्क दिलेला आहे. कायद्याच्या कालबध्द अंमलबजावणीसाठी लोकसेवा पुरवण्यात सुलभता, कार्यक्षमता यावी म्हणून शासनाने माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहन द्यावे असे म्हटले आहे. कायद्यामध्ये लोकसेवेचा अर्ज फेटाळल्यानंतर किंवा विलंब झाल्यानंतर पदनिर्देशीत अधिकाऱ्यांविरूध्द अपिलाची सुनावणी घेण्यासाठी व त्यावर निर्णय देण्यासाठी प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांची, द्वितीय अपिलीय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आलेली आहे. पदनिर्देशीत अधिकाऱ्यांवर पाचशे रूपयांपेक्षा कमी नसेल परंतु पाच हजार रूपयांपर्यंत असू शकेल एवढी शास्ती लादू शकतो.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायद्यातील कलम १३ मध्ये महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग गठीत करण्याची तरतूद केलेली आहे. या आयोगात अ) राज्य सेवा मुख्य आयुक्त, ज्यांचे अधिकारक्षेत्र मुंबई शहर जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हा असेल. ब) मुंबई शहर जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हा यांचे क्षेत्र वगळून प्रत्येक महसूल विभागासाठी एक राज्य सेवा हक्क आयुक्त असेल. ज्यांचे अधिकाराक्षेत्र संबंधित महसूल विभागापुरते असेल अशी तरतूद केलेली आहे. तसेच या कलमामध्ये मुख्य आयुक्त आणि आयुक्त हे सार्वजनिक प्राधिकरण यातील प्रशासनाचे व्यापक ज्ञान व अनुभव असलेल्या सार्वजनिक जीवनातील प्रख्यात व्यक्ती असतील. तसेच ते विधिमंडळाचे सदस्य किंवा इतर कोणत्याही लाभाच्या पदावर असणार नाहीत. किंवा कोणताही उद्योग धंदा अथवा व्यवसाय करणार नाहीत असे म्हटले आहे.

आयोगाचे मुख्यालय मुंबई येथे असेल आणि प्रत्येक महसूली विभागामध्ये आयुक्तांची कार्यालयचे असतील असे सांगितले आहे. मुख्य आयुक्त आणि आयुक्त हे पद धारण केल्यापासून पाच वर्षापर्यंत किंवा त्यांच्या वयाच्या पासष्ट वर्षे वयापर्यंत यापैकी जे अगोदर असतील तिथपर्यंत पद धारण करतील. तसेच ते पूर्ननियुक्तीस पात्र असणार नाहीत. मुख्य आयुक्त आणि आयुक्त हे कोणत्याही वेळी राज्यपालांस उद्देशून आपल्या सहीनिशी आपल्या पदाचा लेखी राजीनामा देऊ शकतात.

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग राज्यशासनाला वेगवेगळी सल्ला व सूचना देऊ शकतो. आयोगाकडून लोकसेवा देणारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाची तपासणी केली जाते. लोकसेवा देण्याच्या पद्धतीमध्ये अधिकाधिक पारदर्शकता व सुलभता आणण्यासाठी प्रयत्न करणे आयोगाकडे दाखल झालेल्या अपिलांची सुनावणी घेणे व त्यावर निर्णय घेणे हे कार्य केले जाते.

कलम १९ मध्ये प्रत्येक आर्थिक वर्ष संपल्यानंतर सार्वजनिक प्राधिकरणांच्या लोकसेवा देण्याचया कार्मगिरीला मूल्यामापणाबाबतच वार्षिक अहवाल तयार करणे व तो राज्य सरकारला सादर करणे. राज्य सरकार आयोगाचा अहवाल राज्यविधिमंडळाचया प्रत्येक सभागृहासमोर ठेवेल.

वरील प्रमाणे कायद्यामध्ये जनतेला लोकसेवा हक्क प्रदान करण्याच्या दृष्टीने विविध तरतूदींचा समावेश करण्यात आलेला आहे. या तरतूदींची सुयोग्यरित्या अंमलबजावणी झाल्यास प्रशासनात पारदर्शकता, उत्तरदायित्व, जबाबदारिचे तत्व वाढीस लागेल.

हा कायदा नोकरशाही वर्गाला कालबध्द काम करावयास लावणारा असा कायद्या आहे. या कायद्यामुळे जनतेला लोकसेवा निश्चित कार्यमर्यादेत मिळतील व जनतेला वेळ, पैसा व श्रम वाचतील. प्रशासनात पादर्शकतेचे तत्व वाढीस लागेल आणि प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट सफल होईल. परंतु या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी जनतेने जागरूक असणे अत्यंत गरजेचे आहे. नागरिकांच्या जागरूकतेवरच या कायद्याचे यश अवलंबून आहे.

कायद्यामध्ये बहुतांश तरतूदी या सकारात्मक व जनतेच्या हिताच्या असल्या तरीही यात काही उणिवा आहेत. हा कायद्या शासकीय अर्थपुरवठा करणाऱ्या सार्वजनिक प्राधिकरणांना लागू होतो. अलिकडीलकाळात प्रशासनात खाजगीकरणाचे तत्व स्वीकारण्यात आल्यामुळे बऱ्याच लोकसेवा ह्या नागरिकांना विशिष्ट रकमेच्या फीसची आकारणी करून खाजगी, सहकारी, स्वयंसेवी संस्था कडून पुरवल्या जातात. त्यांना देखील हा कायदा लागू असला पाहिजे. या कायद्यामध्ये कायदेशीर, तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यतेच्या अधिन राहून सेवा पुरवण्याची जबाबदारी असेल. तेव्हा सेवा ही किरकोळ कारणावरून देखील नाकारली जावू शकते. या कायद्यात आयुक्तांना देण्यात आलेले अधिकार हे सिमीत स्वरूपाचे असून ते आदेशात्मक स्वरूपाचे नाहीत. सार्वजनिक प्राधिकरणांच्या लोकसेवा देण्यातील उणिवा दूर करण्यासाठी शिफारशी करू शकतात. परंतु उणिवा दुरूस्त करण्याचे अधिकार आयोगाकडे नाहीत. आयोगाच्या शिफारशी स्वाकारणे हे राज्य सरकारवर अनिवार्य नसून ते राज्य सरकारला अधिकार आहे. कायद्यामध्ये काही उणिवा, त्रुटी असल्या तरीही, या उणिवा, त्रुटी शासनाकडून वेळोवेळी कायदा, नियम करून दूर करता येतात. या कायद्यामुळे जनतेला घरापर्यंत सुविधा प्राप्त करण्यास मदत होईल. कायद्यामुळे नागरिकांना लोकसेवा कालबध्दरित्या प्राप्त होतील व शासकीय योजनांचा फायदा जनतेपर्यंत पोहोचेल आणि खऱ्या अर्थाने सुशासनाची निर्मिती करण्यास हा कायदा पूरक ठरेल. सेवा हमी कायद्यामुळे नागरिकांना इतर हक्क देखील वेळेत प्राप्त होतील व त्यांच्या मुलभूत हक्कांचे संरक्षण देखील घडून होईल.

## संदर्भ सूची

१. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५-महाराष्ट्र शासन राजपत्र.
2. http://gad.maharashtra.gov.in
3. https://aaplesarkar.mahaonline.gov.in
4. www.aranperencyindia.org.
5. New Papers.